# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone No. 24010437 / 24020781
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : jdwaterdivision@mpcb.gov.in

MAHARASHTRA

Kalptaru Point 2nd floor,
Sion Matunga Scheme Road
No. 8, Infant of Sion Cercal,
Sion (E), Mumbai – 400 022.

"Your Service is our Duty"


No./MPCB/JD(WPC)/ENV/PH/B- 241209- FTS- 0043 Date: 09/12/2024

**To,**
**The Principal Secretary,**
**Environment & Climate Change Department.**
**Government of Maharashtra,**
**Room No. 217 (Annex) New Administration Building,**
**Mantralaya, Mumbai-400032.**

**Sub:** Environmental Clearance - Proceedings of Public Hearing in respect of **Proposed Project** for Expansion of Existing cement standalone grinding unit from 0.9 Million Ton Per Annum to 6.0 Million Ton Per Annum at existing site only i.e. at Sr. No. 105, 109/1, 109/2, 108/1, 108/2/1, 108/2/2, 108/2, 108/3/1, 78/1, 112/1, 103/2, 107/2, 107/1, 101/2/2, 102, 106/1/1, 106/1/2, 100, 104/1, 104/2, 80/1, 83/2, 108/1/2, 79/3, 101, At- Parli Vaijnath, Tehsil-Parli (V), District-Beed. **Proposed by** M/s. UltraTech Cement Limited, At- Parli Vaijnath, Tehsil-Parli (V), District-Beed, Maharashtra.

**Ref:** Sub-Regional Parbhani submitted proceeding vide dt-11.11.2024, received on 18.11.2024.

**Sir,**

The Public Hearing for **Proposed Project** for Expansion of Existing cement standalone grinding unit from 0.9 Million Ton Per Annum to 6.0 Million Ton Per Annum at existing site only i.e. at Sr. No. 105, 109/1, 109/2, 108/1, 108/2/1, 108/2/2, 108/2, 108/3/1, 78/1, 112/1, 103/2, 107/2, 107/1, 101/2/2, 102, 106/1/1, 106/1/2, 100, 104/1, 104/2, 80/1, 83/2, 108/1/2, 79/3, 101, At- Parli Vaijnath, Tehsil-Parli (V), District-Beed. **Proposed by** M/s. UltraTech Cement Limited, At- Parli Vaijnath, Tehsil-Parli (V), District-Beed, Maharashtra.

Environmental public hearing Conducted on dtd. 24.10.2024, Time-12.00 Noon. At M/s. UltraTech Cement Limited, At- Parli Vaijnath, Tehsil-Parli (V), District-Beed (Factory Site), Maharashtra. The minutes of the public hearing approved and duly signed by the Public hearing panel along with the proceedings are enclosed.

a. Minutes of public hearing duly signed by the Chairman of public hearing panel in (English & Marathi)
b. Copy of Office Order
c. Video DVD and Photograph of Public Hearing.
d. List of participants.
e. Newspaper Notices for Environmental Public Hearing in English & Marathi.

This is submitted for further necessary action please.

**Yours Sincerely,**

**(Dr. Avinash Dhakne IAS),**
**Member Secretary**

**Encl: As above**

**Copy submitted for Information to:**

The Member Secretary, MPCB, Mumbai.

**Copy for information & necessary action to:**

1) The Regional Officer, Chattrapati Sambhajinagar.
2) The Sub Regional Office, MPCB, Parbhani.
3) EIC, M.P. C. Board, Mumbai - For information & display of Minutes on website.

**Copy to the applicant of the project:**

M/s. UltraTech Cement Limited, At- Parli Vaijnath, Tehsil-Parli (V), District-Beed, Maharashtra.

**मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, सर्व्हे नं. १०५, १०९/१, १०९/२, १०८/१, १०८/२/१, १०८/२/२, १०८/२, १०८/३/१, ७८/१, ११२/१, १०३/२, १०७/२, १०७/१, १०१/२/२, १०२, १०६/१/१, १०६/१/२, १००, १०४/१, १०४/२, ८०/१, ८३/२, १०८/१/२, ७९/३, १०१, परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये विद्यमान सिमेंट स्वतंत्र ग्राइडींग युनिट ०.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष ते ६.० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचे उत्पादन विद्यमान जागेमध्येच करणे बाबत दिनांक २४/१०/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, गाव परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त:-**

---

मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, सर्व्हे नं. १०५, १०९/१, १०९/२, १०८/१, १०८/२/१, १०८/२/२, १०८/२, १०८/३/१, ७८/१, ११२/१, १०३/२, १०७/२, १०७/१, १०१/२/२, १०२, १०६/१/१, १०६/१/२, १००, १०४/१, १०४/२, ८०/१, ८३/२, १०८/१/२, ७९/३, १०१, परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये विद्यमान सिमेंट स्वतंत्र ग्राइडींग युनिट ०.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष ते ६.० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचे उत्पादन विद्यमान जागेमध्येच करणे बाबत दिनांक २४/१०/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, गाव परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. श्री. अरविंद लाटकर, अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांची निवडणुक आयोगातर्फे परळी विधानसभा मतदारसंघासाठी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन नेमणूक करण्यात आली असल्यामुळे व उमेदवारांचा अर्ज भरण्याची तारीख व वेळ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:०० वाजेपर्यत असल्यामुळे त्यांना त्यांचे कार्यालय सोडता येत नव्हते या कारणास्तव सदरची सुनावणी दुपारी ०३:०० वाजेनंतर घेण्यात यावी असे आदेशित केले त्या अनुषंगाने सदर लोकसुनावणीच्या ठिकाणी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर तसेच उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, परभणी हे दुपारी १२:०० वाजता उपस्थित राहून सूनावणीस उपस्थित नागरीकांना समिती अध्यक्षाच्या आदेशानुसार दुपारी ०३:०० वाजेनंतर घेण्यात येईल असे कळविले.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं. ई-१६३/२०२४ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २४१००१- एफटीएस-००७६, दि. ०१/१०/२०२४ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. **श्री. अरविंद लाटकर,** : अध्यक्ष
अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई.

२. **श्री. मनिष होळकर** : सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर.

३. **श्री. सो. म. कुरमुडे,** : समन्वयक
उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, परभणी.

श्री. सो. म. कुरमुडे, समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, परभणी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड, सर्व्हे नं. १०५, १०९/१, १०९/२, १०८/१, १०८/२/१, १०८/२/२, १०८/२, १०८/३/१, ७८/१, ११२/१, १०३/२, १०७/२, १०७/१, १०१/२/२, १०२, १०६/१/१, १०६/१/२, १००, १०४/१, १०४/२, ८०/१, ८३/२, १०८/१/२, ७९/३, १०१ यांच्या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये विद्यमान सिमेंट स्वतंत्र ग्राइडींग युनिट ०.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष ते ६.० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमता चे उत्पादन विद्यमान जागेमध्येच करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी जमलो आहोत. सदर प्रकल्प हा केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो. ज्यास महाराष्ट्र शासन पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, मुंबई यांची मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दिं. २६/०७/२०२४ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. २४/१०/२०२४ वेळ-दूपारी १२.०० वा. निश्चित करण्यात आली. अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना सदरच्या लोकसुनावणीठीचे अध्यक्षपद भुषविण्याकरीता दिं. ०३/१०/२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी, बीड यांनी नामनिर्देशित केले होते. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दि. २२/०९/२०२४ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
२. जिल्हा परिषद कार्यालय, बीड.
३. जिल्हा उद्योग केंद्र, बीड.
४. तहसिल कार्यालय, परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड.
५. नगर परिषद, परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड.
६. पंचायत समिती, परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड.
७. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, देवकृपा इमारत, पहिला मजला, रंगनाथ महाराज नगर, नांदखेडा रोड, परभणी.
८. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, दैनिक लोकपत्रच्या मागे, जालना रोड, छत्रपती संभाजी नगर.
९. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
१०. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, परभणी येथे एकूण २ सूचना इमेलद्वारे प्राप्त झाल्या असून त्याची नोंद घेण्यात आलेली आहे व सोबत जोडण्यात येत आहे. तरी उपस्थित नागरिकांमंधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर नोंदवू शकतात. तदनंतर त्यांनी, सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

त्याअगोदर प्रकल्पाचे प्रतिनिधी श्री. के. व्ही. रेडडी यांनी मंचावर उपस्थित पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांना सादरीकरणा आधी दोन शब्द बोलण्यासाठी वेळ दयावा अशी विनंती केली. त्यांनी सर्वप्रथम पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती चे अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई श्री. अरविंद लाटकर साहेब, जाहीर लोकसुनावणी समिती चे सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर श्री. मनिष होळकर साहेब व जाहीर लोकसुनावणी समिती चे समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, परभणी श्री. सो. म. कुरमुडे साहेब तसेच येथे उपस्थित गावातील नागरिक, इतर अधिकारी, पत्रकार वर्ग यांचे मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड परिवाराकडून सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीमध्ये हार्दिक स्वागत केले. पूढे त्यांनी सदर प्रकल्पाच्या उत्पादनाबाबत थोडक्यात विषद केले. तसेच नागरिकांनी मांडलेल्या सूचना, आक्षेप यांचे समाधानकारकरित्या अवलोकन/अंमलबजावणी करण्यात येईल असेही सांगितले.

श्री. दिनकर पाटील, मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, उद्योगाचे प्रतिनिधी, यांनी अगोदर प्रकल्पाच्या उत्पादनाबाबत सांगितले की, प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये विद्यमान सिमेंट स्वतंत्र ग्राइडींग युनिट ०.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष ते ६.० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमता चे उत्पादन हे दोन टप्प्यात होणार आहे. प्रथम टप्प्यात विद्यमान सिमेंट स्वतंत्र ग्राइडींग युनिट ०.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष ते ३.० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमता पर्यंत वाढवणे आणि दूस-या टप्प्यात ३.० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेची अतिरिक्त सिमेंट मील उभारणे. यासाठी अतिरिक्त जागा लागणार नाही सद्या असलेल्या जागेमध्येच याचे उत्पादन होणार आहे. तसेच पूढे त्यांनी प्रकल्पाबाबत विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, कच्चा माल व इंधन, सिमेंट उत्पादन प्रक्रिया, साठवण सुविधा, बांधकाम क्षेत्र, हरित पटटा/वृक्षारोपण, व्यवसायीक आरोग्य व सूविधा, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थिक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम (सीएसआर), पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डीग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प प्रतिनीधी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे यांनी सांगितले की, उपस्थित नागरिकांमंधून कोणास कांही प्रश्न/आक्षेप/टिका/टिप्पणी असतील तर त्यांनी सर्वप्रथम आपले नाव व गावाचे नाव सांगून मांडावेत तसेच सदर लोकसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे उपस्थित नागरिकांनी केवळ पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत.

त्यानंतर प्रस्तावित प्रकल्पाबाबत खालील प्रमाणे सूचना/हरकती/आक्षेप इत्यादी प्राप्त झाले. त्याचे प्रकल्प व्यवस्थापकाच्या वतीने सल्लागार/प्रतिनीधी यांनी दिलेले उत्तर/आश्वासन खालीलप्रमाणे आहेत-

| अ.क्रं. | केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव. | उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर. |
|---|---|---|
| १. | **श्री. राजेश साबने, संपादक दैनिक परळी प्रहार, रा. परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड** यांनी सांगितले की, आमचे परळी शहर प्रदूषण व आजारामूळे अगोदरच त्रस्त आहे. त्यातच या प्रकल्पामध्ये प्रस्तावित उत्पादन क्षमतेची वाढ होणार असल्यामूळे प्रदूषणात अजून भर पडण्याची शक्यता आहे. तसेच येथील बरेच नागरिक श्वसनाच्या आजाराचे रूग्ण आहेत. त्यासाठी प्रकल्प प्रवर्तकाने या रूग्णासाठी आरोग्य केंद्र उभारावे व येथील नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करून मोफत उपचार करावे. येथील स्थानिक नागरिकांना रोजगारांमध्ये प्राधान्य देण्यात यावे व त्यांना कायमस्वरूपी रुजू करणेसाठी कंपनीने प्रयत्न करावे. तसेच सदर कंपनीने प्रदूषण होवू नये यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात व नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रयत्न करावे हि विनंती. | **यावर प्रकल्पाचे श्री. के. व्ही. रेडडी,** यांनी रोजगार विषयी बोलताना सांगितले की, सद्य:स्थीतीत असलेल्या प्लांटमध्ये स्थानिक नागरिकांनाच प्राधाण्य देण्यात आलेले आहे त्यामध्ये जवळपास ८०% नागरिक आजूबाजूच्या गावातील, परळी शहरातीलच आहेत. तसेच पूढेही या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये स्थानिक नागरिकांनाच प्राधाण्य देणार आहोत. यामध्ये कूशल/अकूशल कामगार राहतील. बांधकाम सुरू झाल्यानंतर योग्यतेनूसार कामगार घेण्यात येणार आहेत. |
| २. | **श्री. चेतन अरविंद सौंदळे, नगरसेवक, रा. परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड** यांनी सर्वप्रथम व्यासपीठावर उपस्थित पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती चे अध्यक्ष अप्पर जिल्हाधिकारी श्री. लाठकर साहेब, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी श्री. होळकर साहेब, उप प्रादेशिक अधिकारी श्री. कुरमुडे साहेब तसेच येथे उपस्थित सर्व नागरिक यांचे स्वागत व आभार व्यक्त केले. पूढे बोलतांना त्यांनी सांगितले की, परळी शहराचे देशातच नाही तर जगामध्ये १२ ज्योतीर्लिंगापैकी एक ज्योतीर्लिंगाचे शहर म्हणून ओळख आहे. तसेच या शहराची उद्योजक नगरी म्हणून ओळख आहे त्यामूळे मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड या भागामध्ये उभारण्यासाठी मी आपले आभार व स्वागत करतो. पूढे त्यांनी सांगितले की, यापूर्वी पर्यावरण विषयक जनसूनावण्या झाल्या आहेत | **यावर प्रकल्पाचे श्री. के. व्ही. रेडडी,** यांनी सांगितले की, आपण मांडलेल्या सूचनांची कारखान्याने नोंद घेतली असून त्याप्रमाणे सविस्तर आराखडा तयार करण्यात येईल. मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड परिवाराकडून आपणास आश्वासन देतो की आपल्या सूचनानूसार आम्ही नक्कीच कारखान्यामध्ये सूधारणा करू आणि त्याचे तंतोतंत पालन करण्यात येईल.<br><br>पूढे त्यांनी प्रकल्पाची किंमतीबाबत बोलताना सांगितले की, प्रकल्पाची एकूण किंमत रू. ६०० कोटी आहे. त्यातील रू. ६० कोटी हा पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी खर्च करण्यात येईल. ज्यामध्ये बॅग फिल्टर, एसटीपी, ध्वनी नियंत्रण यंत्रणा, पाणी शींपडण्यासाठी टॅंकर्स सूविधा, वृक्षलागवड व इतर बाबी असतील जेणेकरून प्रदूषण कमी करण्यास मदत होईल. तसेच भारत सरकार व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या |

| | | |
|---|---|---|
| | परंतू त्यामध्ये आपणास आलेल्या सूचनांची अमलबजावणी किती झाली या बाबत शंका आहे. तसेच प्रकल्पाचे संचालक श्री. रेडडी साहेब यांनी सांगितल्या प्रमाणे २ मायक्रॉन्स एवढे प्रदूषण वाढण्याची श्यकता आहे त्यासाठी त्यांनी योग्य त्या उपाययोजना व पर्यावरणाची योग्य ती काळजी घेण्यात येणार आहे असे सांगितले. या शहराचे पूढे चालून प्रदूषीत किंवा धूळीचे शहर अशी ओळख होवू नये यासाठी त्यांनी खालीलप्रामणे बाबी/सूचना प्रकल्प धारकांना सांगितल्या-<br><br>१. सदर प्रस्तावित प्रकल्पाची एकूण किंमत किती आहे ते सांगावे हे येथील सर्व नागरिकांना कळणे गरजेचे आहे.<br>२. प्रकल्पातील वर्षाचा सीएसआर निधी हा येथील सामाजीक विकास, सामाजीक बांधीलकीसाठी जवळपास २० ते २५ सामाजीक कर्यासाठी वापर करण्यात यावा.<br>३. उद्योगाला चालना मिळण्याच्या अनुषंगाने येथे रोजगार निर्मिती होणार आहे यामध्ये स्थानिक नागरिकांना रोजगारांमध्ये प्राधान्य देण्यात यावे तसेच कायमस्वरूपी नोकरी देण्यात यावी यासाठी आपण प्रयत्न करावेत.<br>४. शहरातील वाहतूकीमूळे हल्ली धुळीचे प्रमाण वाढले आहे. आपल्या कंपनीमध्ये धूळ होवू नये यासाठी योग्य त्या उत्तम उपाययोजना करण्यात याव्यात.<br>५. कारखान्यातील धूळीच्या प्रदूषणामूळे नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. यामध्ये कंपनीतील कामगार, परिसरातील बालक, वयोवृध्द यांना श्वसनाचे आजार, डोळयाचे विकार, त्वचेचे आजार आहेत. याअगोदरही आम्ही एक हॉस्पीटल ची मागणी केली | अटी व शर्तीनूसार सर्व नियमांचे पालन करून सदर प्लांट चालविला जाईल अशी आपणास ग्वाही देतो.<br><br>पूढे त्यांनी वृक्षारोपणाबाबत सांगितले की, हरित पटटा विकास करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये रस्त्याच्या बाजूला तसेच आजूबाजूच्या गावामध्ये गावक-यांशी चर्चा करून वृक्षारोपण करण्यात येईल.<br><br>सामाजिक कामे कंपनीच्या सीएसआर निधी मधून करण्यात येतील आपण सांगितल्याप्रमाणे शैक्षणीक शाळा डीजीटल शाळा व्हावी यासाठी कंपनी प्रयत्न करेल. तसेच आजूबाजूच्या गावातील ज्या काही समस्या, अडचणी असतील त्यासाठी गावाक-यांसोबत बैठक घेवून त्यांच्या म्हणण्यानूसार सदरचे कामे पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन त्यांनी उपस्थीत नागरिकांना दिले.<br><br>पूढे त्यांनी नागरिकांचे आरोग्य आणि दवाखाना उभारणे बाबत सांगितले की, कंपनीमध्ये सध्या एक दवाखाना अगोदरपासूनच कार्यरत आहे. यात डॉक्टर २४ तास उपस्थीत असतो यामध्ये कामगराच्या आरोग्याची तपासणी वेळोवेळी करण्यात येते. तसेच कंपनीतर्फे आजूबाजूच्या गावामध्ये मोफत आरोग्य तपासणी शीबीर राबवण्यात येते. ज्या गावामध्ये मागील २ वर्षापासून शीबीराचे आयोजन झाले नाही अशा गावांनी आम्हाला कळवावे ते गावक-यांसोबत चर्चा करून येत्या वर्षामध्ये आपण आरोग्य तपासणी शीबीर राबवण्यात येईल.<br><br>पूढे त्यांनी सांगितले की, सदर कारखान्यामध्ये पाण्याचा वापर करण्यात येत नाही त्यामूळे सांडपाणी निर्मिती होणार नाही. आपण जे घरगूती वापरासाठी पाणी वापरणार आहोत ते एसटीपी मधून प्रक्रिया करून ते उद्योगपरिसरातील बगिच्यासाठी वापरले जाणार आहे. ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी ध्वनी रोधक आवरण (Acoustic Enclosure) बसवण्यात येईल. तसेच |

| | | |
|---|---|---|
| | होती. आताही आम्ही सामाजीक विकासाच्या दृष्टीने नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी एक सूसज्ज हॉस्पीटल या परिसरात उभारण्यात यावे अशी मागणी करतो. तसेच बांधीलकी जपण्यामध्ये अल्ट्राटेक, टाटा, बिरला या कंपनीचे योगदान नेहमी राहीलेले आहे. त्यामूळे आम्हाला खात्री आहे की आपण यासाठी नक्कीच मदत कराल. तसेच धूळीचे प्रदूषण होवू नये यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात.<br>६. आजूबाजूच्या परिसरामध्ये तसेच शहरातील धूळीचे प्रदूषण कमी करण्यासाठी धूळ ओढून घेणा-या मशीनरीज या प्रकल्पाच्या माध्यमातून नगर पालिकेला पुरवाव्यात.<br>७. सदर प्रकल्पामध्ये प्रस्तावित झाडांची संख्या किती आहे याबाबत सांगावे. तसेच सामाजीक वनिकरण विभाग यांच्या मदतीने परळी शहराला नंदनवन बनवण्याचे काम करण्यात यावे.<br>८. आमची परळी शहरातील केदारी महाराज विद्यामंदीर शैक्षणीक शाळा ही शाळा डीजीटल शाळा व्हावी यासाठी आपण सहकार्य करावे हि विनंती.<br>९. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयाने सदर कारखान्यांवर वेळोवेळी भेट देवून अटी व नियमांचे पालन होत आहे की नाही याची खबरदारी घ्यावी.<br>१०. शहरातील हवेची गुणवत्ता तपासण्यासाठी प्रकल्पातर्फे शहरामध्ये ऑनलाईन मॉनीटरींग सिस्टीम चा डीसप्ले बोर्ड शहराच्या मध्यभागी बसविण्यात यावा. जेणे करून प्रदूषणाचे प्रमाण परिसरातील नागरिकांना समजेल. | येथील कामगारांच्या सुरक्षेसेची संपूर्ण काळजी घेण्यात येते त्यांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे जसे की, हेल्मेट, हातमौजे, इअर प्लग इ. पुरविल्या जातात. प्रकल्पामध्ये ऑनलाईन मॉनीटरींग सिस्टीम बसविण्यात आलेली आहे व सदरची सिस्टीम भारत सरकाच्या व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरशी जोडलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | पूढे त्यांनी सांगितले की, या सर्व सूचनांची आपण काटेकोरणे पालन कराल यात काही शंका नाही. | |
| ३. | **श्री. नारायण गावकवाड, रा. परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड** यांनी सांगितले की, सदर प्रकल्प होणे गरजेचे आहे कारण यामूळे येथील स्थानिक गोरगरीब नागरिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. फक्त एक विनंती की, प्रकल्पधारकाने कंपनीमध्ये धूळनिर्माण होवू नये यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात. तसेच प्रकल्प धारकांना पूढिल वाटचालीस खूप शूभेच्छा व आभार. | **यावर प्रकल्पाचे श्री. के. व्ही. रेडडी,** यांनी सांगितले की, कारखान्यामध्ये धूळनिर्माण होवू नये यासाठी पाणी शींपडण्याचे काम करण्यात येईल. तसेच फलाय ॲश ची वाहतूक बंद टँकरमध्ये करण्यात येते. जर फलाय ॲश वाहतूकमध्ये अजूनही काही समस्या असतील तर आपण दिलेल्या सूचनेनूसार याबाबतीत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. |
| ४. | **श्री. सचिन मराठे, रा. परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड** यांनी सर्वप्रथम या नविन प्रकल्पाला शूभेच्छा देवून आभार व्यक्त केले व पूढे त्यांनी सांगितले की, प्रकल्प धारक व संबधित अधिकारी यांनी वृक्षारोपण मोठया प्रमाणात करावे तसेच वनिकरणासाठी एक आराखडा तयार केला जावा जेणेकरून भविष्यात होणारे हवेचे प्रदूषण रोखण्यास मदत होईल व पावसाळयात देखील याचा आपणास फायदा होईल. | **यावर प्रकल्पाचे श्री. के. व्ही. रेडडी,** यांनी सांगितले की, विद्यमान जागेमध्ये जवळपास ७ हेक्टरवर हरित पटटा विकासासाठी वृक्षारोपण कारखान्याच्या चारही बाजूला करण्यात आलेले आहे. यापूढे जेथे जागा मोकळी असेल तेथे आपण वृक्षारोपण करणार आहोत. |
| ५. | **श्री. ज्ञानेश्वर बळीराम काकडे, रा. परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड** यांनी सांगितले की, या प्रकल्पामध्ये परिसरातील स्थानिक नागरिकांना, नविन मुलांना, मुलींना रोजगारामध्ये प्रथम प्राधाण्य देण्यात यावे तसेच नविन कामगारांना कौशल्य विकास यासाठी प्रशिक्षण देण्यात यावे व कंपनीच्या नवनविन योजना मध्ये सहभागी करावे अशी विनंती करतो. | **यावर प्रकल्पाचे श्री. के. व्ही. रेडडी,** यांनी सांगितले की, आपण या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये स्थानिक नागरिकांनाच प्राधाण्य देणार आहोत. तसेच नविन कामगारांना कौशल्य विकास प्रशीक्षण देण्यात येईल. तसेच त्यांच्या कामाच्या योग्यतेनूसार आपण त्यांना मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड च्या परिवारातील मोठया कंपनीमध्ये काम करण्याची संधी देण्यात येईल यामूळे या कामगारांचा नक्कीच फायदा होईल. |
| ६. | **श्री. ओम बाळासाहेब मुंडे, रा. परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड** यांनी सदर मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड यांच्या व्यवस्थापनाला विनंती केली की, या प्रकल्पा अंतर्गत क्रिकेट लीग खेळाचे आयोजन करण्यात यावे. तसेच त्यांनी प्रकल्प धारकांना पूढिल वाटचालीस शूभेच्या दिल्या. | **यावर प्रकल्पाचे संचालक श्री. के. व्ही. रेडडी,** यांनी सांगितले की, आपण आम्हाला कळवावे कधी आणि कूठे खेळाचे आयोजन करायचे आहे त्याप्रमाणे मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड या व्यवस्थापनाकडून नक्कीच मदत केली जाईल. |

| | | |
|---|---|---|
| ७. | **श्री. वैभव राजदर, रा. परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड** यांनी विचारले की, उन्हाळयामध्ये ब-याचदा शहरात पाण्याची टंचाई निर्माण होते. त्यामूळे सदर प्रकल्प धारकाला विंनती करतो की, आपण पाणी टंचाई वेळी टँकर पुरविण्यात यावेत तसेच शहराच्या आजूबाजूला झाडे लावण्यात यावीत. | **यावर प्रकल्पाचे संचालक श्री. के. व्ही. रेडडी,** यांनी सांगितले की, आपण दिलेल्या सूचनांची मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड या व्यवस्थापनाकडून नोंद घेण्यात आलेली आहे. |
| ८. | **श्री. मनिष होळकर, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर** यांनी सांगितले की, सदरच्या मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड या कंपनीला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे डीसेंबर २०२३ ला संमतीपत्र प्रदान करण्यात आले. सदर संमतीपत्रामध्ये हवा प्रदूषणाबाबत मंडळाकडून रू. ५ लाखाची बँक हमी जप्त करण्यात आली होती. त्यानंतर कारखान्याने हवा प्रदूषण नियंत्रणासाठी काय काय उपाययोजना केल्या व त्याची सद्यस्थिती काय आहे या बाबत सांगावे. | **यावर प्रकल्पाचे श्री. के. व्ही. रेडडी,** यांनी सांगितले की, सदरचा प्लांट हा मे. इंडियन सिमेंट यांच्याकडून आम्ही मागील ३ ते ४ महिन्या अगोदर आमच्या मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कडे हस्तांतरीत करून घेतला आहे. मंडळाकडून बँक हमी जप्त झाल्यानंतर कारखान्याने मागील ४ महिन्याच्या आत हवेचे प्रदूषण टाळण्यासाठी तसेच निघणारी धूळ ही हवेत पसरणार नाही यासाठी बॅग फिल्टर साठी रू. ५० लाख खर्च केलेला आहे. कारखान्यात मागील बाजूला कॉंक्रिटकरण करण्यात आलेले आहे. तसेच कारखान्यात टँकरद्वारे पाणी शींपडण्याचे काम देखील सूरू केले आहे. |
| ९. | **श्रीमती. देविनंदा सुनिल सुर्यवंशी, रा. परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड** यांनी विचारले की, सदर प्रकल्पामार्फत महिलांच्या बचत गटासाठी काही मदत करता येईल का. | **यावर प्रकल्पाचे श्री. के. व्ही. रेडडी,** यांनी सांगितले की, आपल्या दिलेल्या सूचनांची मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड या व्यवस्थापनाकडून नोंद घेण्यात आलेली आहे. |
| १०. | **श्री. रामप्रसाद शर्मा, पत्रकार, दैनिक पार्श्वभूमी, रा. परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड,** यांनी सांगितले की, येथील बाजूच्या शेतक-याची तक्रार आहे की, सदर कारखान्याच्या धूळिमूळे त्यांच्या शेतातील पिकांचे नूकसान होत आहे तर याबाबतीत कंपनीकडून शेतक-यांना नूकसान भरपाई किंवा यावर काय उपाययोजना करण्यात येणार आहे याबाबत संक्षिप्तमध्ये सांगण्यात यावे. | **यावर प्रकल्पाचे संचालक श्री. के. व्ही. रेडडी,** यांनी सांगितले की, आजूबाजूच्या शेतीचे धूळीमूळे नूकसान होवू नये यासाठी अगोदरच विद्यमान असलेल्या प्लांटच्या चारही बाजूने उंच भींत बांधण्यात आलेली आहे तसेच हरीत पटटा विकास परियोजने अंतर्गत मोठ मोठया झाडांची लागवड कारखान्याच्या बाजूने करण्यात आलेली आहे जेणेकरून निघणारी धूळ कारखान्याच्या आवारातच अडवली जाते ती बाहेर जात नाही. तसेच या कारखाण्यात कूठल्याही प्रकारचे केमीकल वापरले जात नाही. या प्लांटमध्ये पाण्याचा वापर होत नाही. जे काही पाणी वापरले जाते ते येथील कर्मचारी, कामगारांसाठी असते. त्यासाठी एसटीपी प्लांट बसविलेला आहे. यानंतरसूध्दा आजूबाजूच्या |

| | | |
|---|---|---|
| | | शेतीचे नूकसान होत असेल तर त्याची कपंनीकडून सदर यंत्रणेद्वारे तपासणी करण्यात येईल व त्याचा अहवाल आपणास दिला जाईल. |
| ११. | **श्री. अंजनेय नागेनहल्ली, पर्यावरणवादी, समग्रा परिवर्तन समूदाय, कर्नाटक,** यांनी प्रकल्प व्यवस्थापनाला शुभेच्छा आणि समर्थन दिले. तसेच सांगितले की, कंपनीने हरित पटटा विकासासाठी एकूण ३३% वृक्षारोपण करावे. व आजूबाजूच्या गावांना पिण्याच्या पाण्याची सुविधा करण्यात यावी. | **यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, परभणी,** यांनी सांगितले की, आपल्या दिलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. |
| १२. | **श्री. मोहन जगदीश परदेशी, दैनिक पार्श्वभूमी, रा. परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड,** यांनी सांगितले की, कंपनीच्या सीएसआर निधी अंतर्गत येथील जेष्ठ नागरिकांसाठी डोळयांच्या तपासणी व ऑपरेशनसाठी कॅम्प चे आयोजन करण्यात यावे तसेच रस्त्याच्या दोन्हीही बाजूने वृक्षारोपण करण्यात यावे. | **यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, परभणी,** यांनी सांगितले की, आपल्या दिलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. |

श्री. मनिष होळकर, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा सदस्य पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी, यांनी सदर प्रकल्प धारकांना सूचित केले की, सदर प्रकल्पाच्या पॉवर पॉईंट सादरीकरणामध्ये तसेच इआय ड्राफट मध्ये कोल ची क्षमता (Calorific value) चुकीची दर्शविलेली आहे सदर इआय ड्राफट मध्ये सुधारणा करून घ्याव्यात.

श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, परभणी तथा समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी, यांनी सांगितले की, श्री. होळकर साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे इआय ड्राफट मध्ये प्रकल्प प्रर्वतकाने सुधारणा कराव्यात. तसेच पूढे त्यांनी नमूद केले की, उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, परभणी येथे तसेच सदर जाहीर लोकसूनावणी दरम्यान एकूण ८ सूचना/आक्षेप प्राप्त झालेल्या आहेत ते खालीलप्रमाणे-

१. श्री. व्हि. सुनंदा रेडडी, पर्यावरणवादी, तेलंगना यांची सूचना दिं. १०/१०/२०२४.
२. श्री. राजाभाउ मारोती आघाव, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय सारडगांव, ता. परळी (वैजनाथ), जि. बीड यांची सुचना दिं. २३/१०/२०२४.
३. श्री.संघमित्रा बाबासाहेब मुंडे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय लोणारवाडी, ता. परळी (वैजनाथ), जि. बीड यांची सुचना दिं. २४/१०/२०२४.
४. श्री. उर्मिला बंडू गुटटे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय कासारवाडी, ता. परळी (वैजनाथ), जि. बीड यांची सुचना दिं. २४/१०/२०२४.

५. श्री. अशोक श्रीराम लोखंडे, परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड यांची आक्षेप दिं. २४/१०/२०२४.
६. श्री. बाळासाहेब लोखंडे, परळी (वैजनाथ), ता. परळी (वैजनाथ), जि. बीड यांची आक्षेप दिं. २४/१०/२०२४.
७. श्री. अंजनेय नागेनहल्ली, पर्यावरणवादी, समग्रा परिवर्तन समूदाय, कर्नाटक, यांची सुचना दिं. २४/१०/२०२४.
८. श्री. रंगराव कोठाकोंडा, पर्यावरणवादी, सेव अर्थ, तेलंगना, यांची सुचना दिं. २४/१०/२०२४.

वरील सर्व सूचना/आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे व सोबत जोडण्यात येत आहे.

श्री. अरविंद लाटकर, अप्पर जिल्हाधिकारी अंबाजोगाई तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी सर्वप्रथम मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड यांच्या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये विद्यमान सिमेंट स्वतंत्र ग्राइडींग युनिट ०.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष ते ६.० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमता चे उत्पादन बाबत आज दिं. २४/१०/२०२४ रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी येथे उपस्थित प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, इतर विभागाचे अधिकारी, परिसरातील नागरिक व प्रकल्प व्यवस्थापनाचे कर्मचारी यांचे स्वागत व आभार व्यक्त केले. तसेच उपस्थित नागरिकांनी काही सुचना/आक्षेप मांडलेत त्यांची येथे नोंद घेण्यात आलेली असून सदर माहिती रेकॉर्डींग करण्यात आली आहे तसेच संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात त्याची नोंद घेण्यात येईल व जशास तसे शासनास पाठविण्यात येईल पुढे त्यांनी प्रकल्प धारकांना सुचीत केले की सी.एस.आर फंड चा वापर स्थानिक नगरपालिका, ग्रामपंचायत व स्थानिक सेवाभावी संस्था यांच्याशी चर्चा करुन परिसरातील हवा प्रदूषण नियंत्रणाच्या उपाय योजना जसेकी बॅटरीवर चालनारे स्वयम चलित धूळ जमा करणारे यंत्र, पाणी फवारणी यंत्र इत्यादीची खरीदी करुन ते जवळच्या ग्रमपंचायत व नगरपालिकांना देण्यात यावे तसेच कारखाना परिसरामध्येही वापरण्यात यावे जेणे करुन परिसरातील हवा प्रदूषण नियंत्रणात येण्यास मदत होईल. प्रकल्प प्रवर्तकांने सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करावे. पुढे त्यांनी सदरील नागरिकांनी उपस्थित केलेल्या मुददयांची थोडक्यात उजळणी केली. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदरील कारखान्याला वेळोवेळी भेटी देवून संमतीपत्रातील अटी व नियमांचे पालन होत आहे की नाही याची खबरदारी घ्यावी असे सुचित केले. यानंतर अजून कोणाचे प्रश्न, मत, टिका, सूचना करावयचे असतील तर त्यांचे स्वागत आहे असे संबोधित केले, तथापि, कोणीही पुढे आले नाही. तद्नंतर शेवटी त्यांनी उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली असे जाहीर केले.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

| | | |
|---|---|---|
| सो. म. कुरमुडे | होळकर<br>मनिष होळकर | अरविंद लाटकर |
| (समन्वयक) | (सदस्य) | (अध्यक्ष) |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, परभणी. | प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर. | अप्पर जिल्हाधिकारी अंबाजोगाई. |